महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२२ दि. १८/१०/२०२२

## " वाहतुक नियंत्रण अधिसुचना "

**ज्याअर्थी** नौपाडा वाहतुक उप विभाग हद्दीमध्ये डॉ. मुस रोड–साई कृपा हॉटेल, तसेच राम मारूती रोड वरील मोनिका शॉप– पुना गाडगीळ चौक – रांका ज्वेलर्स व देवा शर्टस समोरील रोडवर दिवाळी सणानिमीत्त विविध संघटनेतर्फे **दि. २४/१०/२०२२ रोजी "दिवाळी पहाट"** हा सास्कृतीक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे वेळी बहुसंख्य नागरीक कार्यक्रमास सहभागी होऊन गर्दी होते. यास्तव कार्यक्रमाचे वेळी सदर मार्गावरील व परिसरातील वाहतूक सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद :–** १) डॉ. मुस चौकाकडून गडकरी सर्कलच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना डॉ. मुस चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने डॉ. मुस चौकातून सरळ टॉवर नाका–टेंभीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** २) गडकरी रंगायतन जवळील सर्कल कडून डॉ. मुस चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गडकरी सर्कल येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने गडकरी सर्कल येथून अल्मेडा चौक–वंदना टी पॉईंट–गजानन चौक–तीन पेट्रोल पंप–हरीनिवास सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** ३) घंटाळी साईनाथ चौकाकडून गाडगीळ चौकाचे दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना श्रध्दा वडापाव, घंटाळी चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने घंटाळी चौकातून घंटाळी देवी पथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** ४) गजानन चौक ते तीन पेट्रोल पंप या सावरकर रोड वरील काका सोहनी पथ या गल्लीतून गाडगीळ चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने तीन पेट्रोल पंप–हरीनिवास सर्कल मार्गे अथवा घंटाळी रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** ५) राजमाता वडापाव सेंटर कडून गजानन महाराज चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना राजमाता वडापाव सेंटर येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने राजमाता वडापाव सेंटर येथून गोखले रोडने इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसूचना दि. २४/१०/२०२२ रोजी ०६.०० ते १४.०० वाजे पर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड,रूग्णवाहिका,पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/- सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे श्हार

मा.जिल्हाधिकारी,ठाणे

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :-

प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे

परिवहन व्यवस्थापक ठाणे महानगरपालीका ठाणे

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१,ठाणे व विशेष शाखा,ठाणे

प्रत:- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :- सपोआ ठाणे वाहतूक उपविभाग.

प्रभारी अधिकारी, नौपाडा/कोपरी वाहतूक शाखा.

२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner